Pimpalner Education Society's

KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND

KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,

PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

**7.1.1: Institution has initiated the Gender Audit and measures for the promotion of gender equity during the last five years. Describe the gender equity & sensitization in curricular and co-curricular activities, facilities for women on campus etc.**

**Response:**

Kindly refer the list of programs conducted in academic year 2018-19.

| Sr. No. | Name of the activity | Date of organization | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Workshop on Stress Management | 16/09/2018 | 2-4 |
| 02 | University Level Personality Development Camp at Baripada | 10 to 12 Oct 2018 | 5-9 |
| 03 | AIDS Awareness Programme | 13/01/2019 | 10-13 |
| 04 | Health Awareness Campaign | 01/04/2019 | 14-16 |
| 05 | Yoga Day Celebration | 21/06/2019 | 17-18 |

PES Karmvee A. M. Patil Arts, Commerce & Kai. Annasaheb N. K. Patil Sci. Sr. College Pimpalner Tal. Sakri Dist. Dhule

# 1. Workshop on Stress Management : 16 Sept. 2018









दैनिक
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
दिव्य मराठी

# ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यावर विद्यार्थ्यांसाठी पिंपळनेरला कार्यशाळा

प्रतिनिधी | पिंपळनेर

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालयातर्फे विद्यार्थी विकास विभागांतर्गत ताणतणाव व्यवस्थापनावर कार्यशाळा झाली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. या वेळी धुळे येथील अभय महिला महाविद्यालयाचे मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जी.बी. चौधरी, प्रा. जे.पी. अमृतकर उपस्थित होते. प्रा.डॉ. चौधरी म्हणाले की, धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती तणावाखाली जगत आहे. तणाव कमी करण्यासाठी प्रत्येकाने आधी स्वतःला ओळखले पाहिजे. स्वतःची बलस्थाने व कमतरतांचा शोध घेतला पाहिजे. त्याचबरोबर आपल्या कुवतीप्रमाणे करिअरसाठी क्षेत्राची निवड केली पाहिजे. सकारात्मक विचार करण्यावर भर देण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे म्हणाले की, निसर्गात प्रत्येक बाबतीत विविधता आहे. प्रत्येक व्यक्तीचा मेंदू, बुद्धांक वेगळा असतो. स्वभाव भिन्नभिन्न असतो. त्यामुळे कुणाचीही ईर्षा करू नये, असेही ते म्हणाले. विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. के.आर. राऊत यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. ए.जी. खरात यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. राम पेटारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. के. काकड यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. संजय खोडके, प्रा. पी.एम. सावळे यांनी प्रयत्न केले.



पिंपळनेर येथे झालेल्या कार्यशाळेत बोलताना उपस्थित मान्यवर.

# स्वतःची बलस्थाने कोणती हे जाणून घ्या

## डॉ. चौधरी : पिंपळनेर महाविद्यालयात ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

पिंपळनेर, ता. ३० : आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती तणावात जगत आहे. हा ताण कमी करण्यासाठी प्रथम स्वतःला ओळखा, स्वतःची बलस्थाने व कमतरता कोणत्या हे जाणून घ्या. कुवतीप्रमाणे विषय निवडा, सकारात्मक दृष्टीने विचार करा, असा मोलाचा सल्ला धुळ्यातील अभय महिला महाविद्यालयाचे मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जी. बी. चौधरी यांनी दिला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व येथील कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयातर्फे विद्यार्थी विकास विभागांतर्गत 'ताणतणाव व्यवस्थापन' कार्यशाळा झाली. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. प्रा. जे. पी. अमृतकर प्रमुख पाहुणे होते.

प्राचार्य डॉ. सोनवणे म्हणाले, की निसर्गात प्रत्येकबाबतीत विविधता आहे. प्रत्येक व्यक्तीचा मेंदू, बुद्धांक वेगळा व स्वभावही भिन्न भिन्न असतो. त्यामुळे ईर्षा न करता निकोप स्पर्धा करावी.

विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. के. आर. राऊत यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. ए. जी. खरात यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. राम पेटारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. के. काकड यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. संजय खोडके, प्रा. पी. एम. सावळे प्रयत्नशील होते.



**पिंपळनेर : ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. जी. बी. चौधरी. शेजारी प्रा. डॉ. राम पेटारे, प्रा. के. आर. राऊत, प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, प्रा. जे. पी. अमृतकर.**

लोकमत

# पिंपळनेरला 'ताणतणाव व्यवस्थापन' कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपळनेर** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि कर्म. आ.मा. पाटील कला, वाणिज्य व अण्णासो एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास विभागांतर्गत 'ताणतणाव व्यवस्थापन' कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे होते. प्रमुख अतिथी म्हणून धुळे येथील अभय महिला महाविद्यालयाचे मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. जी.बी. चौधरी, प्रा.जे.पी. अमृतकर उपस्थित होते. प्रा.डॉ. चौधरी म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती तणावात जगत आहे. हा ताण कमी करण्यासाठी प्रथम स्वत:ला ओळखा, स्वत:ची बलस्थाने व कमतरता कोणत्या हे जाणून घ्या. आपल्या कुवतीप्रमाणे विषय निवडा. सकारात्मक दृष्टीने विचार करा. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे म्हणाले की, निसर्गात प्रत्येक बाबतीत विविधता आहे. प्रत्येक व्यक्तीचा मेंदू, बुद्ध्यांक वेगळा असतो. स्वभाव भिन्न-भिन्न आहे. त्यामुळे ईर्षा न करता निकोप स्पर्धा करा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.के.आर. राऊत यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा.डॉ. ए.जी. खरात यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. राम पेटारे यांनी केले. आभार प्रा.एस. के. काकड यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा.संजय खोडके, प्रा.पी.एम. सावळे आदींचे सहकार्य लाभले.

**3. University Level Personality Development Camp**
**In Villege, Baripada: 10 to 12 Oct. 2018**









कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
आणि
पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी, पिंपळनेर संचलित
नॅक पुनर्मूल्यांकीत ब श्रेणी प्राप्त
कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य आणि कै. अण्णासाहेब
एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर ता. साक्री जि.
विद्यार्थी विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना
आयोजित
विद्यापीठस्तरीय


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
आणि
पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी, पिंपळनेर संचलित
नॅक पुनर्मूल्यांकीत ब श्रेणी प्राप्त
कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य आणि कै. अण्णासाहेब
एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर ता. साक्री जि.
विद्यार्थी विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना
आयोजित
विद्यापीठस्तरीय


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
आणि
पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी, पिंपळनेर संचलित
नॅक पुनर्मूल्यांकीत ब श्रेणी प्राप्त
कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य आणि कै. अण्णासाहेब
एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर ता. साक्री जि.
विद्यार्थी विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना
आयोजित
विद्यापीठस्तरीय

व्यक्तिमत्वाचा उपयोग सामाजिक उत्थानासाठी करा

# चैत्राम पवारांसारखे तरुण घडावेत

। पिंपळनेर/ प्रतिनिधी।

व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेप्रसंगी कुलगुरु डॉ. पी.पी.पाटील यांचे प्रतिपादन

विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडे विविध उपक्रम राबविले जात असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकासासह सामाजिक उत्थानासाठी करावा व या कार्यशाळेतून चैत्राम पवार यांसारखे तरुण घडावेत व विद्यार्थ्यांनी आपल्या गावात असे उपक्रम राबवावेत असे आवाहन कुलगुरु प्रा. डॉ. पी.पी. पाटील यांनी शिबिरार्थींना केले. बारीपाडा येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व कर्म.आ. मा. पाटील कला, वाणिज्य आणि कै. अण्णासो एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार, व्यक्तीमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



### यांनी केले सहकार्य

» महाविद्यालयाचा परिचय प्रा.एम.बी.एखंडे, प्रा.जे.पी. अमृतकर, प्रा.के.आर. राऊत, प्रा.डॉ. डब्ल्यू.बी. शिरसाठ, प्रा.डॉ. बी.सी. मोरे यांनी करून दिला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. राम पेटारे, प्रा. संजय खोडके यांनी तर आभार प्रा. पी.एम. सावळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. व्ही.जी. उगलमुगले, प्रा. के.डी. कदम, प्रा.एस.के. काकड, प्रा. एस. एन. तोरवणे, प्रा.के.एन. वसावे, प्रा.एल.जी. गवळी, प्रा.वाय.एम. नांद्रे, प्रा.सी.एन. घरटे आदींनी सहकार्य केले.

### यांची होती उपस्थिती

» **कार्यक्रमाच्या** अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री.आर.एन. शिंदे होते. व्यासपीठावर चैत्राम पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य दिलीप रामू पाटील, विद्यार्थिनी महाविद्यालय प्राचार्य डॉ.डी.एस. सूर्यवंशी, संस्थेचे सचिव, प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे, जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. हसीन शेख, बारीपाड्याचे सरपंच सिंधुबाई पवार, संस्थेचे उपाध्यक्ष सुरेंद्र मराठे, महाविद्यालय व्यवस्थापन समिती चेअरमन धनराज जैन, सदस्य एच.आर. गांगुर्डे, भागवत सोनवणे, प्रा. एस.डी. पालखे, प्रा.डॉ. अशोक मराठे, प्राचार्य डॉ. संजय शिंदे आदी उपस्थित होते.


NEWS


पुण्य नगरी

। गुरुवार,११ ऑक्टोबर २०१८ । धुळे


# श्रमसंस्कारातून समाज उत्थानाचे नैतिक बळ -कुलगुरु

पिंपळनेर : विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या शक्तीचा व बुद्धीचा उपयोग सामाजिक उत्थानासाठी करावा, आपल्याकडे असलेल्या गुणांमुळे समाजाची नैतिक उंची वाढते, असे सांगून श्रमसंस्कारामुळे व्यक्तीमत्व फुलते. या माध्यमातून तरुणांना जगण्याची दिशा मिळते व समाज उत्थानाचे काम करण्याचे खरे नैतिक बळ मिळते, असे प्रतिपादन उमविचे कुलगुरु डॉ.पी.पी.पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य आणि कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ारीपाडा येथे विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार, व्यक्तिमत्व व नेतृत्व ‍कास कार्यशाळेस कालपासून प्रारंभ झाला. उद्घाटनाप्रसंगी ते ‍लत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आर. एन. शिंदे होते. ंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चैत्राम पवार, व्यवस्थापन परिषदेचे ‍स्य दिलीप रामू पाटील, व्यवस्थापन सदस्य डॉ. डी. एस. ‍वंशी, प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, जिल्हा विद्यार्थी विकास ‍धिकारी प्रा. हासीम शेख, बारीपाड्याच्या सरपंच सिंधु पवार



आदी उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष सुरेंद्रराव मराठे, कॉलेज कमिटीचे चेअरमन धनराज जैन, सदस्य एच. आर. गांगुर्डे, भागवत सोनवणे, प्रा. एस. डी. पालखे, प्रा. डॉ. अशोक मराठे, प्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. एम. बी. एखंडे, प्रा. जे. पी. अमृतकर, प्रा. के. आर. राऊत, प्रा. डॉ. डब्ल्यू.बी. शिरसाठ, प्रा. डॉ. बी. सी. मोरे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. राम पेटारे व प्रा.संजय खोडके यांनी केले तर आभार प्रा. पी. एम. सावळे यांनी मानलेत. कार्यक्रमासाठी प्रा. व्ही.जी. उगलमुगले, प्रा. के. डी. कदम, प्रा. एस. के. काकड, प्रा. एस. एन. तोरवणे, प्रा. के. एन. वसावे, प्रा. एल. जी. गवळी, प्रा. वाय. एम. नांद्रे, प्रा. सी. एन. घरटे यांनी परिश्रम घेतले.

दैनिक दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र

# विद्यार्थ्यांच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य : पाटील

प्रतिनिधी | पिंपळनेर

विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व येथील कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालयातर्फे साक्री तालुक्यातील बारीपाडा येथे श्रमसंस्कार, व्यक्तिमत्त्व व नेतृत्व विकास कार्यशाळा झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष आर. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. या वेळी चैत्राम पवार, व्यवस्थापन परिषदचे सदस्य दिलीप रामू पाटील, विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एस. सूर्यवंशी, संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. हासीम शेख, बारीपाड्याच्या सरपंच सिंधूताई पवार, संस्थेचे उपाध्यक्ष सुरेंद्र मराठे, कॉलेज कमिटीचे चेअरमन धनराज जैन, सदस्य एच.आर. गांगुर्डे, भागवत सोनवणे, प्रा. एस.डी. पालखे, प्रा.डॉ. अशोक मराठे, प्राचार्य डॉ. संजय शिंदे आदी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. पी.पी. पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्यावे. व्यक्तिमत्त्व विकासावर अनेक बाबी अवलंबून असतात. विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे ते म्हणाले. चैत्राम पावरा यांनी बारीपाड्यात राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

4. AIDS Awareness Programme
: 13 January 2019






## 4. AIDS Awareness Programme
## : 13 January 2019








# पिंपळनेर महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना

■ पिंपळनेर । दि.२० । वार्ताहर

येथील कर्म.आ.मा. पाटील वं कै. अण्णासो एन.के. पाटील महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातंर्गत रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे हे होते. ग्रामीण रुग्णालय, पिंपळनेर येथील समुपदेशक हेमंत जाधव व मयुर निकम उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना युवा दिनाची शपथ देवुन एड्स चिन्हाची मानवी साखळी तयार करण्यात आली.

प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे यांनी जनमानसात एच.आय.व्ही./ एड्स बद्दल असलेल्या गैरसमज याविषयी माहीती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रेड रिबन क्लबचे समन्वयक प्रा.डॉ.पी.पी. तलवारे यांनी केले.

यावेळी विज्ञान शाखेतील प्रा.डॉ. डब्ल्यू.बी. शिरसाठ, प्रा.डॉ. वाय.एस. मोरे, प्रा.डॉ.आर. के.पेटारे, प्रा.के.डी. कदम, प्रा.डॉ.बी.सी. मोरे, प्रा.एम.बी. एखंडे, प्रा.डॉ. संजय खोडके, प्रा.व्ही.जी. उगलमुगले, प्रा.एस. के. काकड, प्रा.डॉ. एन.बी. सोनवणे हे उपस्थित होते.



पिंपळनेर (ता. साक्री) : वरिष्ठ महाविद्यालयात एड्सबद्दल माहिती व शपथ देताना हेमंत जाधव, मयूर निकम.

# पिंपळनेरला महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना

**पिंपळनेर :** येथील कर्मवीर आ. मा. पाटील व (कै.) अण्णासाहेब एन. के.पाटील महाविद्यालयात आरोग्य विभागांतर्गत रेड रिबन क्लब स्थापना केला. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. समुपदेशक .हेमंत जाधव व मयूर निकम उपस्थित होते. युवा दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनींना युवा दिनाची शपथ दिली. एड्स चिन्हाची मानवी साखळी तयार केली.
प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी एचआयव्ही-एड्सबद्दल असलेल्या गैरसमजवर मार्गदर्शन केले. क्लबचे समन्वयक प्रा. डॉ. पी. पी. तलवारे यांनी सूत्रसंचालन केले.

**6. Health Awareness Campaign**
**: 1 April 2019**



**6. Health Awareness Campaign**
**: 1 April 2019**



**6. Health Awareness Campaign**
**: 1 April 2019**

**दै. पुण्यनगरी**

# निसर्गाच्या सानिध्यात निरोगी जीवन जगा – डॉ. स्वागत तोडकर



**पिंपळनेर** : पृथ्वीवरच्या सर्व जीवांच्या आरोग्याचे रक्षण करण्याची ताकद निसर्गात आहे. माणसाला निसर्ग सांभाळतो, आपण रक्षण करा असे सांगून आजच्या डॉक्टर्स मंडळींवर विश्वास राहिला नाही. रूग्णांची फसवणूक करतात, म्हणून निसर्गच वाचवू शकतो. रूग्णांना आधाराची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ.स्वागत तोडकर यांनी केले. पिंपळनेर येथे आयोजित आरोग्य व घरगुती उपचार पद्धती याविषयी मार्गदर्शन कार्यक्रमात बोलताना केले.

येथील कर्म.आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के.पाटील महाविद्यालय व रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सध्याच्या धावपळीच्या युगात, तसेच रासायनिक अन्नपदार्थांचे सेवन, बदललेली जीवनशैली यामुळे माणसाचे मानसिक व शारीरिक संतुलन बिघडत चालले आहे. यातून व्यक्तीला अनेक व्याधी, आजार जडत आहेत. यावर औषधी उपचारांपेक्षा त्या व्यक्तीला मानसिक आधाराची जास्त गरज आहे. तसेच हे आजार घालविण्यासाठी निसर्गातील पाने, फुले, फळे, वृक्ष, वेली यांचा रस, काढा हा अधिक गुणकारी ठरतो हे अनुभवातून सिध्द झाले आहे, असेही ते म्हणाले. गुटखा, दारु, विडी यांसारख्या व्यसनांपासून दूर रहा व वर्षातून किमान एकदा तरी शरीरशुध्दी करा असे, आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पिंपळनेर महाविद्यालय व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. स्वागत तोडकर यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस. टी. सोनवणे यांनी केले, सुत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.ए.जी. खरात यांनी तर आभार प्रा.एस.डी.पाटील यांनी मानलेत. डॉ.प्रा ए.जी खरात यांनी परिश्रम घेतले. यावेळी सरपंच साहेबराव देशमुख, रिखबशेठ जैन, जयवंत बागड, हातिमभाई बोहरी, धनराज जैन,सुरेंद्रराव मराठे, प्रकाश विसपुते, उपसरपंच विजय गांगुर्डे, डॉ. विवेकानंद शिंदे यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

**सकाळ**

# निसर्गाच्या सान्निध्यात राहून निरोगी जीवन जगा

## डॉ. स्वागत तोडकर : पिंपळनेरला आ. मा. पाटील महाविद्यालयात आरोग्यावर व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**





**पिंपळनेर : जिल्हा परिषद कन्या शाळेच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात बोलताना डॉ. स्वागत तोडकर. समोर उपस्थित महिला व नागरिक.**
(छायाचित्र : **अंबादास बेनुसकर**)

पिंपळनेर, ता. २ : सध्याच्या धावपळीच्या युगात बदललेली जीवनशैली, तसेच रासायनिक अन्नपदार्थांचे सेवन यामुळे आपले मानसिक व शारीरिक संतुलन बिघडत चालले आहे. यातून व्यक्तीला अनेक व्याधी, आजार जडत आहेत. यावर औषधी उपचारांपेक्षा मानसिक आधाराची जास्त गरज आहे. या आजारांवर प्रतिबंधासाठी निसर्गातील पाने, फुले, फळे, वृक्ष, वेलींचा रस, काढा अधिक गुणकारी ठरू शकतो. निसर्गाच्या सानिध्यात राहून आपण निरोगी जीवन जगू शकतो, असे प्रतिपादन कोल्हापूर येथील डॉ. स्वागत तोडकर यांनी केले.

येथील कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे डॉ. तोडकर यांचे येथील जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेच्या प्रांगणात नुकतेच व्याख्यान झाले, त्यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी महाविद्यालय व येथील ग्रामस्थांतर्फे डॉ. तोडकर यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले. ते म्हणाले, की गुटखा, दारू, विडी यांसारख्या व्यसनांपासून प्रत्येकाने दूर राहावे. वर्षातून किमान एकदा शरीरशुद्धी करावी. त्यांनी मधुमेह, रक्तदाब, संधिवात, अस्थमा, पोटाचे विकार, नेत्र विकार, त्वचा विकार, थायरॉइड, मूतखडे, गुडघे, कंबरदुखी, केसांची समस्या, मूळव्याध, बवासीर, डोकेदुखी, स्त्रियांचे सर्व विकार, दाढदुखी, अर्धशिशी, हाडांची समस्या, वजन कमी करणे, वाढविणे आदी समस्यांवर सखोल मार्गदर्शन करत घरातीलच पदार्थांपासून या आजारांवर मात कशी करावी, याचे विवेचन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. ए. जी. खरात यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. डी. पाटील यांनी आभार मानले. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे सर्व सदस्य, कर्मचारी, पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Jalgaon, Dhule-Today
03/04/2019 Page No. 3

**7. Yoga Day Celebration**
**: 21 June 2019**






**7. Yoga Day Celebration**
**: 21 June 2019**

